कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे), इमारत परवानगी कक्ष, बृहन्मुंबई क्षेत्र,
खोली क्र. ३९-४१, तळमजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१.

जा.क्र.: का.अ. (पू.उ.)/इपक/बृ.क्षे./म्हाडा/ET-1477/२०२३
दिनांक :- 29 AUG 2023

ITC Cell.
M. H. & A. D. Authority
Inward No.: 2294
Date: 30.08.2023

01/09/2023
LC T02
payal

प्रति,
मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, म्हाडा,
पहिला मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**विषय :-** टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) येथील चाळ क्र. १८८ व १८९, **टागोर नगर शुभलक्ष्मी** सह.गृह.नि.संस्था मर्या., न.भू.क्र. ३४६ (भाग), टागोर नगर, विक्रोळी (पूरव) मुंबई ४०० ०८३ या इमारतीच्या पुर्नविकासाबाबत.

**संदर्भ :-**
१. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.टीपीएस-१८२०/अ नै २७/ प्र.क्र. ८०/२० नवि-१३, दि. १४.०१.२०२१.
२. म्हाडा परिपत्रक क्र. एम.एच./मुं.मं.-२/उप. मुख्य अ./इ.प.क./बृ.क्षे./प्रा./ ईटी-४५४/२०२१, दि. २३.०२.२०२१.
३. या कार्यालयाचे Amended Plan मंजूरी पत्र क्र. MHADA- ०८/०१६/२०२१ दि. १०.०८.२०२१.
४. विकासक, मे. श्री एसेस रियल्टी, यांचे दि. २४.०८.२०२३ रोजीचे पत्र व दि. २३.०८.२०२३ रोजीचे हमीपत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाला अनुसरुन संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्र. २ च्या म्हाडा प्राधिकरणाच्या परिपत्रकान्वये विषयांकित प्रकल्पाकरिता विकासकाला पुर्नविकास इमारतीच्या आराखड्यांना मंजूरी देताना फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकाकरीता आकारण्यात आलेल्या अधिमुल्य रक्कमेकरिता मे. मवानी क्रियेशन एलएलपी यांना ५०% सुट देण्यात आलेली आहे. या पुर्नविकास प्रकल्पातील EWS/LIG/MIG/HIG क्षेत्रातील घरे/सदनिका/वाणिज्यिक-औद्योगिक इतर गाळे घेणाऱ्या ग्राहकांना देय मुद्रांक शुल्काचा भरणा विकासक (मे. श्री एसेस रियल्टी) यांनी करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर योजनेचा लाभ विकासकांना देण्यात आलेला आहे.

विषयांकित इमारतीच्या पुर्नविकासाच्या आराखड्यांना मंजूरी देताना विकासक मे. श्री एसेस रियल्टी यांना दि. १४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण **७३.६२ चौ.मी.** (निवासी वापर) करिता फंजिबल अधिमुल्य रकमेवर ५०% सुट देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने विकासकांनी **९६.४५ चौ.मी.** (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या ०२ सदनिकांच्या मुद्रांक शुल्कचा भरणा करण्यासंबंधी खालील बाबींची पुर्तता करावयाची आहे.

I. या योजनेमध्ये सहभागी होवू इच्छिणाऱ्या प्रकल्पांकरीता संबंधित विकासकाने ग्राहकांचे पूर्ण मुद्रांक शुल्क भरण्यात येणार असल्याचे हमीपत्र नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

II. अशा प्रकल्पामधील मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासकामार्फत करण्यात आला असल्याने लाभार्थी ग्राहकाचे प्रमाणपत्र विकासकास नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

III. विकासकाने ज्या ग्राहकांच्या अशा प्रकारे मुद्रांकांचा संपूर्ण खर्च केला आहे, त्यांची यादी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी लागेल.

IV. जे प्रकल्प या योजनेत सहभागी होतील त्या प्रकल्पांची अथवा प्रकल्पांच्या ज्या भागासाठी सवलत घेतली आहे त्याची यादी, महानगरपालिका आयुक्त / नगरपरिषद अथवा नगरपंचायत मुख्याधिकारी / जिल्हाधिकारी / नियोजन प्राधिकरण यांच्यामार्फत माहितीकरीता मुद्रांक नोंदणी कार्यालयास कळवावी लागेल. तसेच संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करावी लागेल.

V. या सवलतींचा लाभ घेणाऱ्या प्रकल्पांना, लाभ घेतलेल्या बांधकाम क्षेत्राची विक्री होईपर्यंत मुद्रांक शुल्क सवलतीचा लाभ चालु ठेवावा लागेल.

त्यानुसार विकासकांनी **९६.४५ चौ.मी.** (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या ०२ सदनिकांच्या मुद्रांक शुल्कचा भरणा करणे आवश्यक होते. सदर इमारतीत विकासकामार्फत ०२ सदनिकांची विक्री करण्यात आली असून सदर ०२ सदनिकांच्या विक्री कराराकरीता मुद्रांक शुल्काचा भरणा विकासकाने केला आहे. तसेच, याबाबत विकासकाने दि. २३.०८.२०२३ रोजीचे हमीपत्र सादर केले आहे. विकासकाने ०२ सदनिकांचे सह दुय्यम निबंधक, कुर्ला १ यांचेकडे विक्री करारनामा नोंदणी केलेल्या ग्राहकांचे प्रमाणपत्र व सूची क्र. २ या कार्यालयाकडे सादर केलेली आहे. सदर ०२ सदनिकांचा तपशील खालील प्रमाणे असून सोबत परिशिष्ट-अ मधील माहिती म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**सोबत :-** परिशिष्ट-अ

आपला विश्वासू,

कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष / म्हाडा

**प्रत :-** मा. उपमुख्य अभियंता / इपक / प्रा. यांना माहितीकरीता.

# परिशिष्ट - अ

टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) येथील चाळ क्र. १८८ व १८९, **टागोर नगर शुभलक्ष्मी** सह.गृह.नि.संस्था मर्या., न.भू.क्र. ३४६ (भाग), टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) मुंबई ४०० ०८३ या इमारतीच्या पुर्नविकासामधील खालील सदनिकांच्या विक्री करारावर मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासक, मे. श्री एसेस रियल्टी, यांचे मार्फत करण्यात आला आहे. सदर लाभार्थी ग्राहकाची यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

| **अ.क्र.** | **सदनिका क्रमांक** | **बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी.** | विक्रीबाबत **सद्य:स्थिती** |
|---|---|---|---|
| १ | सदनिका क्र. २२०१ | ३७.२१ | Mrs. Fauzia Mohammaed Sohail Siddiqui यांना विक्री करण्यात आला आहे |
| २ | सदनिका क्र. २२०२ | ५९.२४ | Mr. Jawed Zaheer Ansari & Mrs. Saiqa Jawed Ansari यांना विक्री करण्यात आला आहे |
| | **एकूण =** | **९६.४५** | |

आपला विश्वासू,

कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष / म्हाडा

2) ICT/A